पुण्य नगरी

# येडशी जि.प. शाळेत सायबर सुरक्षा मार्गदर्शन

**येडशी:** धाराशिव तालुक्यातील येडशी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि. ८) मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.



या उपक्रमामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलनातील वैष्णवी पाटील या विद्यार्थिनीने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल उदाहरणाद्वारे माहिती दिली. अशा प्रकारची फसवणूक होऊ नये म्हणून काय दक्षता घ्यावी याबाबतही यावेळी मार्गदर्शन केले.अनोळखी व्यक्तींना ओटीपी सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले कॉल्स पडताळणी करून घ्यावेत, व्हाट्स ॲपवर इतर सोशल मीडियावर आलेले मेसेज व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्रॉंग वापरून आपली माहिती सुरक्षीत करावी, आपली माहिती ही आपली जबाबदारी आहे असे सांगितले. मोबाईल, संगणक, लॅपटॉप इत्यादी साधनावर अधिकृत अॅन्टीव्हायरसचा वापर करावा असे आवाहन केले. या कार्यक्रमास मुलांची शाळा , कन्या शाळा व उर्दु शाळेचे सर्व मुख्यध्यापक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.